# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२००६/प्र.क्र.२५/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ५ मार्च, २००७.

प्रति,
जिल्हाधिकारी,
नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली,
औरंगाबाद, जालना, लातूर, हिंगोली, परभणी, बीड
उस्मानाबाद, नांदेड, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा

विषय:- राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान
यंत्रावरील मतमोजणी

राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर मतदान करण्यासंबंधी सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश क्रमांक-रानिआ/२००५/प्र.क्र.२४/का-७, दिनांक- ३ मे, २००५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. या आदेशास जोडलेल्या नमुना-व्हीएम-४ यामध्ये मतमोजणीच्या निकालासंबंधी प्रपत्र देण्यात आले आहे.

२. राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या मतदान यंत्रावरील ज्यावेळी जिल्हा परिषद मतदार गट व पंचायत समिती मतदार गण या दोन्हीसाठी एकत्रित निवडणूक घेण्यात येते त्यावेळी बॅलट युनिटवरील "End" बटन सुरु असते. या बटनांचा वापर अपवादत्मक परिस्थितीत काही मतदार करण्याची शक्यता आहे, त्यामुळे मतदानासाठी आलेले एकूण मतदार व त्या पदाकरिता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या यामध्ये तफावत पडण्याची शक्यता आहे. या कारणास्तव मतदान यंत्रामधील मतमोजणीचा निकाल पुढीलप्रमाणे दिसेल :-

(१) सर्वप्रथम "to" असे दिसेल, यामध्ये किती मतदारांनी मतदान यंत्राचा वापर केला त्याचा एकूण आकडा दिसेल.

(२) यानंतर "t1" असे दिसेल, त्यामध्ये जिल्हा परिषद मतदार गटाकरिता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या "t1" येथे दिसेल. मतदार गटामधील उमेदवारांना मिळालेल्या एकूण मतांची बेरीज ही "t1" मध्ये दिलेल्या आकडयांशी जुळेल.

(३) त्यानंतर मतदान यंत्रामध्ये "t2" असे दिसेल, त्यामध्ये पंचायत समिती मतदार गणासाठी प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या दिसेल. पंचायत समिती मतदार गणातील उमेदवारांना मिळालेल्या एकूण मतांची बेरीज ही "t2" मध्ये दिलेल्या आकडयांशी जुळेल.

३. शक्यता अशी आहे की, "to" "t1" आणि "t2" यांची आकडेवारी जुळणार नाही, ही बाब सर्व उमेदवारांना मतदान यंत्र सील करतानाच स्पष्ट करुन दयावी म्हणजे नंतर वाद निर्माण होणार नाही.

( पी. एस. मीना )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग